राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक 513 दिनांक 1 ऑगस्ट, 1923 द्वारा स्थापित व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 द्वारा संचालित विद्यापीठ)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – 440 001.
दूरध्वनी कार्यालयः 0712–2522991 फॅक्स : 0712–2555701

# अधिसूचना

क्रमांक : रातुमनावि/साप्र/विसनि/2010/3 दिनांकः31ऑगस्ट, 2010

नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंद पुस्तात नावाची नोंद करण्यासाठी विद्यापीठातर्फे दिनांक 12 जुलै, 2010 रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/विसनि/2010/1 ला जोडून दिनांक 12 ऑगस्ट, 2010 रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या करण्यात आलेल्या अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/विसनि/2010/2 अन्वये, पदवीधरांच्या नोंद पुस्तात नावाची नोंद करण्याचे दृष्टिने 'प्रपत्र–अ' सादर करण्याची अंतिम तिथी दिनांक 30 ऑगस्ट, 2010 पर्यंत वाढविण्यात आली होती.

वरील प्रमाणे प्रकाशित करण्यात आलेल्या अधिसूचनांना जोडून सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, पदवीधरांना आपल्या **नावाची नोंद पदवीधरांच्या यादीत करण्याचे दृष्टिने 'प्रपत्र–अ' दिनांक 15 सप्टेंबर, 2010 पर्यंत (कार्यालयीन वेळेत सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत) (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून)**, दिनांक 12 जुलै, 2010 रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या (क्रमांक रातुमनावि/ साप्र/ विसनि/2010/1) अधिसूचनेत नमूद केलेल्या इतर कार्यप्रणाली व अटींसह सादर करता येईल.

तसेच पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्यास पात्र असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले नाही अशा पदवीधरांना त्यांनी उत्तीर्ण केलेल्या परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेच्या आधारे आणि विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या खालील नमूद केलेल्या परीक्षांच्या अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेच्या आधारे **संबंधीत पदवीधरांना 'प्रपत्र–अ' दिनांक 15 सप्टेंबर, 2010 पर्यंत (कार्यालयीन वेळेत सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत) (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून)**, दिनांक 12 जुलै, 2010 रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या (क्रमांक रातुमनावि/ साप्र/ विसनि/2010/1) अधिसूचनेत नमूद केलेल्या इतर कार्यप्रणाली व अटींसह सादर करता येईल.

1. उन्हाळी व हिवाळी, 2008 आणि 2009 परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थी.
2. बी.ए. अभ्यासक्रमातील उन्हाळी/हिवाळी, 2007, 2008 आणि 2009 मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी.
3. बी.एस.सी. (आय.टी.), उन्हाळी/हिवाळी, 2005,2006,2007,2008 आणि 2009 मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी.
4. डिप्लोमा इन फॅशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातील उन्हाळी/हिवाळी 2007,2008 आणि 2009 मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी.
5. डिप्लोमा इन टॅक्सेशन अभ्यासक्रमातील उन्हाळी/हिवाळी 2007,2008 आणि 2009 मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी.
6. एम.एम.सी. अभ्यासक्रमातील उन्हाळी/हिवाळी, 2007,2008 आणि 2009 मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी.
7. डिझाईन इन इन्डस्ट्रियल डिझाईन अभ्यासक्रमातील उन्हाळी/हिवाळी, 2007,2008 आणि 2009 मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी.

(डॉ. देबेन्द्रनाथ मिश्रा)
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ